# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०६/२०२५ (रविवारं)**

---

## तारसा रोडवरील गहुहिवरा रेल्वे पुलावरील अवजड वाहतुक वळविल्याबाबत....

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत तारसा गहुहिवरा चौकात महारेल कडुन सन २०२३ साली रेल्वे रूळावर पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. सदर पुलावर ३५ ते ४० टन पर्यंत जड वाहतुक होवु शकते असे सांगण्यात आले होते. जड वाहनांना पर्याय असतांना सुध्दा टोल चुकविण्याच्या उद्‌देशाने ५० ते ६० टन पर्यंतची अवजड वाहने या मार्गाने वाहतुक करत आहे. त्यामुळे पुलावर दोन बाजुमध्ये मधोमध ५ ते ६ इंच पर्यंत अंतर पडले आहे. यापुढेही अशीची अवजड वाहनांची वाहतुक होत राहीली तर पुलाचे नुकसान होवुन पुलाचे दोन्ही बाजुला असलेल्या लोकांच्या वस्तींवर पुल कोसळुन जिवितहानी व मालमत्ताहानी होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु शकतो. **त्यामुळे दिनांक १५/०६/२०२५ पासुन तारसा रोडवरील गहुहिवरा रेल्वे पुलावरील अवजड वाहतुक ही खालीलप्रमाणे वळविण्यात आली आहे**.

१) कोळसा खदान गोंडेगाव, कामठी ओ.सी.एम ते कांद्री ते तारसा चौक ते तारसा रोड कन्हान ते गहुहिवरा रेल्वे पुल कन्हान ते राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ बायपास रोड नागपुर कडे जाणारी वाहतुक ही **कोळसा खदान गोंडेगाव ,कामठी ओ.सी.एम ते जबलपुर नागपुर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ टेकाडी बायपास रोड ते बोरडा टोल नाका ते नागपुर कडे वळविण्यात आली आहे.**

२) कामठी ते तारसा चौक कन्हान ते गहुहिवरा चौक रेल्वे पुल तारसा रोड ते बायपास रोडकडे जाणारी वाहतुक ही **कामठी ते कांद्री ते टेकाडी ते नागपुर जबलपुर राष्ट्रीय महामार्ग क्रं ४४ बायपास रोडकडे कडे वळविण्यात आली आहे.**

३) तारसा रोड ते गहुहिवरा रेल्वे पुल, तारसा रोड कन्हान ते कामठी कडे जाणारी वाहतुक ही **तारसा रोड ते जबलपुर राष्ट्रीय महामार्ग क ४४ बायपास रोड कडे वळविण्यात आली आहे.**

## पोलीस भवन ,पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण जिल्हा येथे एन.डी.पी.एस. कायदयाच्या तरतुदी संबधीत कार्यशाळा

नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थ विक्री, तस्करी, तसेच अंमली पदार्थ सेवन करण्याऱ्यांवर सतत कारवाई केली जात आहे.

मा.श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनासाठी एनडीपीएस कायदयान्वये दाखल होणाऱ्या गुन्हयांमध्ये योग्य तपास होवुन जास्तीत जास्त प्रकरणांमध्ये दोषसिध्दी व्हावी यासाठी एन.डी.पी.एस कायादयाच्या तरतुदीचे ज्ञान अदयावत करणेकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयातील,सर्व ठाणे प्रभारी अधिकारी, गुन्हे प्रगटीकरण पथक प्रभारी, तसेच स्थानिक गुन्हे शाखा व ईतर शाखेचे अधिकारी आणि अंमलदार यांच्यासाठी दिनांक १४/०६/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा, पोलीस भवन ,नागपुर येथे कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती.

सदर कार्यशाळेत जिल्हा व सत्र न्यायालय नागपुर येथील विशेष सरकारी अभियोक्ता श्री विनोद हुकरे आणि श्रीमती कल्पना पांडे यांनी कार्यशाळेस उपस्थित पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना **एनडीपीएस कायादयाच्या तरतुदीबाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेस नागपुर ग्रामीण जिल्हयातील,सर्व ठाणे प्रभारी अधिकारी आणि शाखा प्रभारी अधिकारी यांच्या सह एकुण ६२ पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांची उपस्थिती होती.**



## पोलीस स्टेशन कुही अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीचा २४ तासाच्या आत घेतला शोध, स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी.

सदर गुन्हा कुही पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा कळमना शेंत शिवार येथे दिनांक १४/०६/२०२५ रोजी घडला आहे. यातील फिर्यादी नामे बबनराव सिताराम मगरदे, वय ६३ वर्ष, रा.कुकडे ले आउट, पार्वती नगर, अजनी, नागपुर यांनी पोलीस स्टेशन कुही येथे रिपोर्ट दिली की, त्यांच्या घराचे बांधकाम कळमना उमरेड येथे सुरू असुन त्यांनी बांधकाम देखभाली करीता मृतक नामे सुमंतलाल म्हरसकोल्हे, वय ५५ वर्ष, रा. छपरा, जि. शिवनी, राज्य मध्य प्रदेश यास चौकीदार व मजुर म्हणुन ठेवले होते. तसेच फिर्यादी यांनी सुमारे तीन ते चार

दिवसापुर्वी यातील आरोपी महीला व दोन विधीसंघर्ष ग्रस्त बालकांना सुध्दा यांना कामावर ठेवले होते. दिनांक .१४/०६/२०२५ रोजी सकाळी ११/००वा. फिर्यादी बांधकामाचे ठिकाणी हजर असताना यातील आरोपी महीला व विधीसंर्घष ग्रस्त बालक हे ऑटो रिक्षाने बांधकामाचे ठिकाणी आले. तेव्हा मृतक हा तेथेच काम करत होता. त्यानंतर फिर्यादी हे नाश्ता करण्यासाठी मौजा कळमना येथे गेले व तासाभरानंतर  परत आले तेव्हा यातील आरोपी हे कामावर दिसुन आले नाही.  फिर्यादीने मृतकला आवाज दिला परंतु त्याने काहीच प्रतिसाद दिला नाही. तेव्हा फिर्यादी हे घराचे आतमध्ये जावुन पाहिले असता मृतक हा पडलेला दिसला त्याचे डोक्याला व चेहऱ्याला जखम झालेली दिसली. तसेच त्याला बल्लीला बांधुन असलेले दिसले.नमुद महीला आरोपी आणि विधीसंघर्ष यांनी अज्ञात कारणावरून मृतकाचा खुन केला आहे. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून कलम १०३(१),३(५) भारतीय न्याय संहीता अन्वये खुनाचा गुन्हा नोंद आहे.

**नमुद महीला आरोपी आणि दोन विधीसंघर्ष ग्रस्त बालक हे गुन्हा केल्या पासुन मिळुन येत नव्हते. सदर गुन्हयाचा तपास कुही पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा यांनी सुध्दा समांतर तपास सुरू केला. अवघ्या २४ तासात स्थानिक गुन्हे शाखेच्या  पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्या वरून यातील महीला आरोपी आणि एका विधीसंघर्ष ग्रस्त बालकाला खरबी  रोड,नागपुर येथुन ताब्यात घेतले. नमुद महीला आरोपीला कुही पोलीसांनी अटक केली असुन मा न्यायालयाने दिनांक १६/०६/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**

## काटोल पोलीस स्टेशन अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पोलीस स्टेशन काटोल** :— फिर्यादी नामे राजेद्र सुर्यभानजी ठाकरे वय ५४ वर्ष रा. कडु लेआउट,पंचवटी काटोल यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली की, **मृतक योगेश अमृत घाटे, वय ४० वर्ष रा. मसली** हा फिर्यादीच्या शेतात कामाला होता. फिर्यादीने मृतक कामावर न आल्याने दिनांक १३/०६/२०२५ रोजी मृतकाच्या घरी जावुन पाहणी केली असता त्याच्या पत्नीने मृतक योगेश घरी आलाच नाही म्हणत दरवाजा लावुन दिला. फिर्यादी यांना घरात एक इसम झोपलेला दिसला त्याबाबत विचारणा केली असता मृतकाच्या पत्नीने उडवा उडवीची उत्तरे दिली. मृतकाच्या पत्नीचे वर्तन संशयास्पद वाटल्याने त्यानंतर फिर्यादी पोलीसांसह  मृतकाच्या मौजा मसली येथे गेले असता पोलीसांनी  मृतकाच्या पत्नीची विचारपुस केली असता  तिने उडवा

उडवीची उत्तरे दिली. तसेच पोलीसांना योगेश घरात दिसुन न आल्याने पोलीसांना संशय आला त्यामुळे पोलीसांनी योगेश चा त्याच्या घरात आणि आजुबाजुला शोध घेतला असता मृतक त्याच्या घरामागे १५० फुट अंतरावर मृत अवास्थेत मिळुन आला. योगेश च्या पत्नीनेच योगशचा घातपात केला असावा अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून कलम १०३(१),२३८(ए) भारतीय न्याय संहीता अन्वये खुनाचा गुन्हा नोंद आहे.

**काटोल पोलीसांनी नमुद प्रकरणी मृतकची पत्नी महीला आरोपी आणि आरोपी नामे अनिल दिगांबर तागडे,वय ३५ वर्ष, रा. मसली यांना अटक केली असुन मा न्यायालयाने दिनांक १७/०६/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**

## खापा पोलीस स्टेशन अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीला अटक

**पोलीस स्टेशन खापा** :— फिर्यादी नामे लक्ष्मीकांत मोतीलाल गागाटे, वय ३८ वर्ष रा. किल्लापुरा, खापा ता सावनेर यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली की, दिनांक १५/०६/२५ रोजी माताखेडी खापा , ता. सावनेर येथे **फिर्यादीचा चुलत भाऊ मृतक नामे चेतन अशोक गागाटे,वय ३३ वर्षे, रा. हनुमान घाट, खापा ता सावनेर** याला आरोपी नामे अर्जुन देविदास निळे याने पुर्ववैमस्याच्या कारणावरून त्याचे कडील अग्निशस्त्राने गोळया झाडुन **चेतन अशोक गागाटे, रा. नविन वस्ती, खापा** याचा खुन केला आहे. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून कलम १०३(१),भारतीय न्याय संहीता सह कलम ३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये खुनाचा गुन्हा नोंद आहे.

**खापा पोलीसांनी नमुद प्रकरणी अर्जुन देविदास निळे, वय ३० वर्षे, रा नविन वस्ती, खापा, ता. सावनेर याला तात्काळ अटक केली असुन सदर प्रकरणाचा तपास खापा पोलीस करीत आहेत.**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांची कामगिरी

दिनांक १४/०६/२०२५ रोजी श्री दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीय अधिकारी, नागपुर विभाग यांना गुप्तबातमीदाराकडुन खात्रीशीर बातमी मिळाली की, मोपेड गाडीवर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. अशा माहिती वरून श्री दिपक अग्रवाल यांनी तात्काळ एक पथक तयार करून त्यांना कारवाईचे आदेश दिले. नमुद पथकाने एमआयडीसी चौक येथे नाकाबंदी केली असता एक होंडा ॲक्टीव्हा क्रमांक एम. एच.४९ ए.व्ही ९२३० हे वाहन मिळुन आले. पंचासमक्ष सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. मोपेड चालक **आरोपी नामे संजय प्रल्हादजी डवले, वय—४४ वर्षे , रा. लालगंज वार्ड क्रं ४८, इतवारी नागपुर याचे ताब्यातुन १) सुगंधीत पानमसाला रजनीगंधा, २) पानमसाला राजश्री ब्रॅड ,३) पानमसाला पानपराग , ४) पानमसाला विमल, ५) सुगंधीत तंबाखु व्ही —१ ० ६) सुगंधीत तंबाखु ब्लॅक लेबल १८ असा एकुण २.४३ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती ६,५६० /— रूपये आणि एक होंडा ॲक्टीव्हा क्रमांक एम.एच.४९ ए.व्ही ९२३० किंमती . ५०,०००/—रूपये असा एकुण ५६,५६० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु हा आरोपी क्रं १ याने आरोपी क्रं २ आकाश तारेकर,रा इतवारी याचे कडुन विकत घेतल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली**

नमुद आरोपीतांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपी क्रं १ आणि २ यांच्या पोलीस स्टेशन बोरी येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३, ३(५) सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**नमुद संजय प्रल्हादजी डवले, वय—४४ वर्षे , रा. लालगंज वार्ड क्रं ४८,इतवारी नागपुर याला पोलीसांनी अटक केली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने